## प्रकरण पहिले

## संशोधन पध्दती

१.१ समस्येची मांडणी

१.२ गृहितके

१.३ उद्दिष्टे

१.४ अंक संकलन

१.५ संशोधन आराखडा

१.६ विश्लेषण पध्दती

१.७ प्रकरणाची तोंडओळख

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

१.१ समस्येची मांडणी :

आर्थिक, तांत्रिक आणि सामाजिक प्रगतीमध्ये शिक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. भारतात अद्यापही ४० टक्के लोक निरक्षर आहेत. परंपरागतता हा भारतीयांचा स्थायीभाव आहे. परंपरागततेतून येणाऱ्या समाजविघातक रूढी, चालीरीती यांचा नाश करणे शिक्षणाच्या माध्यमाशिवाय होऊ शकत नाही. तसेच व्यवहारी जगाला नुसत्या पुस्तकी ज्ञानाचा उपयोग होत नाही तर प्रत्यक्ष प्रशिक्षणाच्या माध्यमातून दिले जाणारे शिक्षण उपयोगी ठरते. ग्रामीण भागात सहकारी संस्था चालवणे सहकारी शिक्षणाशिवाय केवळ अशक्य आहे. त्यासाठी राष्ट्रीय सहकारी संघाची ` स्थापना १९२९ साली झाली. (एन.सी.यु.आय.) महाराष्ट्रामध्ये, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची स्थापना १९१८ मध्ये झाली व सांगली जिल्हा सहकारी बोर्डाची स्थापना १९५० साली झाली.

प्रस्तुत लघुशोध प्रबंधात ` सांगली जिल्हा सहकारी बोर्डाचे शिक्षण आणि प्रशिक्षण विषयक कार्यक्रम ` यांचा अभ्यास केला आहे.

शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यासाठी राष्ट्रीय स्तरापासून जिल्हा पातळीपर्यन्त सरकारने एक यंत्रणा उभी केली आहे. या यंत्रणेचा शेवटचा घटक जिल्हा सहकार बोर्ड आहे. याचा एक विशिष्ट अभ्यास प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये मांडला आहे.

जिल्हा सहकारी बोर्डाने राबविलेल्या शैक्षणिक कार्यक्रमाचा आढावा घेणे आणि सहभागी शिबीरार्थी अथवा प्रशिक्षणार्थींवर अशा शैक्षणिक कार्यक्रमाचा कोणता व कसा प्रभाव पडतो इतकी मर्यादित व्याप्ती प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये सीमित केली आहे.

१.२ <u>गृहीतके</u> :

सांगली जिल्हा सहकारी बोर्ड लि., सांगली ही संस्था सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण देणारी जिल्हातील एकमेव संस्था आहे. ही संस्था विविध प्रकारचे शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम राबवित असते. सहकारी कार्यकर्ते, युवक, विद्यार्थी आणि प्रत्यक्ष सहकारी संस्थेतील कर्मचारी वर्गाला शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते. शिक्षण व प्रशिक्षणाच्या माध्यमाने सहकारी चळवळीची गुणवत्ता वाढण्यास मदत होते. सहकारी तत्वे व व्यावहारिक सहकार यांचा सखोल अभ्यास करण्यास यामुळे मदत होते. कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होऊन सहकारी चळवळीमध्ये विविधता आणता येते. सांगली जिल्हा सहकारी बोर्ड याबाबतीत यशस्वीरित्या आपली कर्तव्यपूर्ती करीत आहे. हे सर्व करीत असताना काही अडचणींनाही तोंड द्यावे लागतेच. दिलेल्या शिक्षण व प्रशिक्षणाचा शिबीरार्थी अथवा प्रशिक्षणार्थी घटकाचा अनुकूल परिणाम झालेला दिसून येतो. एकंदरीत गरज लक्षात घेता सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षणाची व्याप्ती आणि सखोलता वाढविणे आवश्यक आहे.

१.३ <u>उद्दिष्टये</u> :

प्रस्तुत अभ्यासाची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत :

१) बोर्डाने राज्य सहकारी संघाच्यावतीने आखलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांचा कर्मचाऱ्यावर, सभासदांवर आणि शिबिरार्थींवर होणारा परिणाम अभ्यासणे.

२) प्रशिक्षणार्थींच्यावर सहकारी शिक्षणाचा कितपत प्रभाव पडला आहे त्याची चाचणी घेणे.

३) सांगली जिल्हा सहकारी बोर्डाची सहकाराविषयीची भूमिका विशद करणे.

४) जिल्हा सहकारी बोर्डाच्या शैक्षणिक कार्यक्रमाविषयी, सहकारी शिक्षणाविषयी काही परिस्थितीजन्य निष्कर्ष काढणे.

५) शैक्षणिक कार्यक्रमांचे मूल्यमापन करणे इत्यादी.

६) सहकारातील मनुष्यबळ विकासाचे महत्व समजून घेणे.

१.४ <u>अंक संकलन</u> :

प्रस्तुत लघुशोध प्रबंधाविषयी लिहिताना प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती, माहिती आणि उपलब्ध साहित्याचा वापर करून अंक संकलन केले आहे. सहकारी शिक्षणविषयक पुस्तके, बोर्डाचे वार्षिक अहवाल, शैक्षणिक कार्यक्रमांना उपस्थित राहून मूल्यमापन नमुने भरून आवश्यक आकडेवारी जमा केली आहे.

तसेच प्रत्यक्ष बोर्डातील अधिकाऱ्यांची अंक संकलनाच्या कामी त्यांच्याशी चर्चा करून माहिती मिळवून प्रस्तुत लघुप्रबंध लिहिला आहे. शिवाय पोस्टर्स, ध्वनिफिती ऐकून माहिती जमा केली आहे.

वरील माहितीवरून जे योग्य वाटले ते निष्कर्ष काढून सुधारणाही सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

१.५ <u>संशोधन आराखडा</u> :

' सांगली जिल्हा सहकारी बोर्ड लि. ' या पश्चिम विभागीय सहकारी मंडळाच्या नियंत्रणाखाली असलेल्या संस्थेच्या स्थापनेला ४० वर्षे पूर्ण झाली. सदर संस्था सहकारी शिक्षण व प्रशिक्षण देण्याचे काम करते.

प्रस्तुत लघुशोध निबंधात सांगली जिल्हा सहकारी बोर्डाच्या स्थापनेपासूनच्या तिच्या प्रगतीचा, सभासदांचा, त्याची वित्तीय माहितीचा, व्यवस्थापनाचा व शैक्षणिक कार्यक्रमांचा आढावा घेण्याचा प्रयत्न झाला आहे. १९५० ते १९९० या ४० वर्षांच्या कालावधीतील बोर्डाच्या कामकाजाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. बदलत्या काळानुरूप शैक्षणिक कार्यक्रमाची व्याप्ती आणि सखोलता कशी वाढवीत न्यावी लागली याचे विश्लेषण केले आहे. या बरोबरच काही निवडक व शैक्षणिक कार्यक्रमाचे (१) दूध सहकारी संस्थांचा कार्यकर्ता मेळावा (२) महिला सहकारी शिबीर, (३) सेवा सहकारी संस्थांचा कार्यकर्ता शिबिर आणि (४) युवक मेळावे इ. मूल्यमापन केले आहे. या मूल्यमापनाचे नमुने बोर्डाने संबंधित प्रशिक्षणार्थीकडून भरून घेतलेले होते. त्यावरून मूल्यमापन केले आहे. मूल्यमापन नमुन्यामध्ये प्रशिक्षणार्थींच्या नावाचा कोठेच उल्लेख नसल्यामुळे त्यांनी आपली मते निर्भिडपणे मांडलेली आहेत.

## १.६ विश्लेषण पध्दती :

उपयोजित संशोधनाच्या अनेक पध्दती आहेत. उदा. परिचयात्मक, वर्णनात्मक, निदानात्मक, प्रयोगात्मक इ.

वरील चार पध्दतीपैकी वर्णनात्मक पध्दती प्रस्तुत लघुशोध प्रबंधासाठी वापरली आहे. शिवाय सरासरी, शेकडेवारी, आलेख इ.चा वापर केला आहे.

## १.७ प्रकरणांची तोंडओळख :

सदर लघुप्रबंध सात प्रकरणामध्ये विभागला आहे.

पहिल्या प्रकरणात ` संशोधन पध्दती ` दिली आहे. त्यातील उपविभागामध्ये समस्येची मांडणी कशी केली ? गृहितके, उद्दिष्टे, अंक संकलन संशोधन आराखडा, विश्लेषण पध्दती इ. बद्दलची माहिती दिली आहे.

दुसऱ्या प्रकरणात ' सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण ' याची गरज आणि महत्व विशद केले आहे. सोबत सहकारातील मनुष्यबळ विकासाची गरज, सहकारी शिक्षणाची उद्दिष्टये, सहकारी शिक्षणाचे महत्व, पाश्चिमात्य देशातील सहकारी शिक्षण इ. बद्दलची माहिती दिली आहे.

तिसऱ्या प्रकरणात ' भारतातील सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण ' याचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये सहकारी शिक्षणाची आवश्यकता, भारतातील सहकारी शिक्षणाचा प्रारंभ व विकास, भारतातील सहकारी शिक्षणाची उद्दिष्टये, भारतातील सहकारी शिक्षणाचे घटक, भारतातील सहकारी शिक्षण पध्दतीची रचना, अभ्यासक्रम आणि इ. संबंधीची माहिती दिली आहे.

चौथ्या प्रकरणात सांगली जिल्हा सहकारी बोर्ड लि., या सहकारी शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेच्या कामकाजाची माहिती दिली आहे. उदा. बोर्डाची उद्दिष्टये, व्यवस्थापन, बोर्डाचे कार्यक्षेत्र, वित्तीय माहिती, सभासद याविषयी सविस्तर चर्चा या प्रकरणात केली आहे.

पाचव्या प्रकरणात सांगली जिल्हा सहकारी बोर्डाच्या शैक्षणिक कार्यक्रमांचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये शैक्षणिक आकृतीबंध, सभासद सचिवांचा कार्यक्रम, आणि सहकार प्रशिक्षण निदेशकांचा कार्यक्रमाचा तपशील दिला आहे.

सहाव्या प्रकरणात शैक्षणिक कार्यक्रमांचे मूल्यमापन केले आहे. त्यामध्ये १) महिला शिबीर, २) युवक शिबीर, ३) दूध सहकारी संस्था कार्यकर्ता शिबीर, ४) सेवा सहकारी संस्था कार्यकर्ता शिबीर यांचे प्रातिनिधिक स्वरूपात मूल्यमापन केले आहे.

सातव्या प्रकरणात लघुशोध प्रबंधाचा समारोप करून काही निष्कर्ष मांडले आहेत.

—x—x—x—x—x—